# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २२/१२/२०२१

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता १ ली ते ७ वी च्या शाळांचे वर्ग सुरक्षितपणे सुरू करणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १९८७ चे कलम २.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.कोरोना२०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-५/ दिनांक १३ मार्च, २०२०.
४) दि. २६/११/२०१२ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झाले मिटींगमध्ये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.
५) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.११३/एसडी-६, दिनांक १० ऑगस्ट, २०२१.
६) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण : २०२१/प्र.क्र.११३/ एसडी-६, दि.२४ सप्टेंबर, २०२१. महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचेकडील.
७) मार्गदर्शक सूचना क्र.सआसे/कोविड/शाळा सुरू होण्यासंदर्भात सूचना/२५६०२-७१०,दि.२८ नोव्हेंबर, २०२१.
८) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.१७८/एसडी-६, दि.२९/११/२०२१.
९) दिनांक १४/१२/२०२१ रोजीची मंजूर टिपणी.

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ६ च्या परिपत्रकान्वये राज्यातील शाळांमधील सर्व सुरू करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.७ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता १ ली ते ४ थी व शहरी भागातील इयत्ता १ ली ते ७ वी च्या शाळांचे वर्ग सुरक्षितपणे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्याअर्थी, मी डॉ. राजा दयानिधी, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबंधित तरतुदीसह, तसेच संदर्भिय क्र.५ च्या शासन परिपत्रकानुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून कोविड-१९ बाबत केंद्र व राज्य शासनाच्या सूचनांचे पालन करण्याच्या अधिन राहून तसेच सद्यस्थितीमध्ये जगभरात ओमायक्रॉन या कोरोना विषाणूच्या स्ट्रेनचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता अधिक काळजी घेणकामी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इयत्ता १ ली ते ७ वीच्या सर्व शाळा दिनांक २०/१२/२०२१ पासून सुरू होतील असे आदेशित करीत आहे. तसेच संदर्भ क्र.५,६,७ व ८ च्या शासन परिपत्रकामधील सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून राज्यातील शाळांमधील वर्ग सुरू करणेबाबतचा नमुद अतिरिक्त मार्गदर्शक सूचना उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जसेच्या तसे लागू करीत आहे.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी शासन व उल्हासनगर महानगरपालिकेद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे/मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करणे सर्व व्यवस्थानाच्या सर्व शाळा यांना बंधनकारक राहील. मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारा व्यक्ती/संस्था/व्यवस्थापन च्या आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ अन्वये अपराध केला असे समजून कारवाईस पात्र राहील. सदर आदेश दिनांक २०/१२/२०२१ पासून उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मा. डॉ.राजा दयानिधी (भा.प्र.से) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी शहरवासीयांना केले आहे.

जनसंपर्क अधिकारी करिता
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका